जा.क्र.वि.शा./राजकीय / २५३ /२०२०
विशेष शाखा, पिंपरी चिंचवड
दिनांक :- ११/०१/२०२१

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे जे ज्या मतदारसंघाचे मतदार नाहीत त्यांनी त्या मतदार संघात न थांबणेबाबत आदेश.**

**आदेश**

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, पत्र क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८ दिनांक ११/१२/२०२० रोजीच्या प्रसिध्दीप्रत्रकान्वये माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणा-या तसेच नव्याने स्थापित एकुण १४,२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामध्ये पुणे जिल्हयातील ७४७ ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला असून त्यापैकी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ५६ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. आचारसंहिता दिनांक ११/१२/२०२० रोजीपासून सुरु होवून दिनांक २१/०१/२०२१ रोजीपर्यंत अस्तित्वात राहील. दिनांक १५/०१/२०२१ रोजी मतदान होणार असून, दिनांक १८/०१/२०२१ रोजी मतमोजणी होणार आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात निवडणूक होणा-या ५६ ग्रामपंचायतीपैकी १० ग्रामपंचायतीची निवडणुक बिनविरोध झाल्याने उर्वरीत ४६ ग्रामपंचायतीत एकुण ६४ मतदान केंद्र व १८५ मतदान बुथचा समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडील पत्र क्रमांक ४६४/आय.एन. एस.टी./ २००७/ पी.एल.एन.-१/ दिनांक ०८/०१/२००७ व दिनांक २७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकीय व्यक्ती जर ते त्या ग्रामपंचायतीचे मतदार नसतील तर त्या ग्रामपंचायत हद्दीत थांबणेबाबत प्रतिबंध करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ते ज्या निवडणुक होणा-या ग्रामपंचायतीचे मतदार नाहीत त्यांना त्या ग्रामपंचायत हद्दीत थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात निवडणूक होणा-या ४६ ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्रात दिनांक १३/०१/२०२१ रोजी १७.३० वा. पासून ते दिनांक १५/०१/२०२१ रोजीचे २४/०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

सर्व राजकीय व्यक्ती किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या निवडणुक होणा-या ग्रामपंचयातीचे मतदार नाहीत त्यांना त्या ग्रामपंचयात हद्दीत थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.सं.कलम १८८ अन्वये कारवाईस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दिनांक ११/०१/२०२१ रोजी देणेत आला आहे.

पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

(कृष्ण प्रकाश)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :- ११ /०१/२०२१